**सत्र खटला क्र. ६५/२०२५**
**शासन विरुध्द सुलतान**
**निशाणी क्र. ६२**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०६ ची जबानी</u>.**

**मी याव्दारे शपथेवर सत्य कथन करतो की,**

**माझे नांव** : इमरान फारुख कुरेशी,

**माझे वय** : ३५ वर्षे व्यवसाय — खाजगी व्यवसाय,

**राहण्याचे गांव** : साळे गल्ली, साठ फीट रोड, लातूर

**<u>सरतपासणी</u> — श्री. चामले अतिरिक्त सरकारी अभियोक्ता.**

**१.** अन्सार कॉलनी, इक्बाल शाळेजवळ, लातूर येथे माझे चिकन दुकान आहे. ते दुकान २—३ वर्षापासून सुरु आहे. आरोपी सुलतान कुरेशी हा माझ्या आत्याचा मुलगा आहे. त्याच घर माझ्या घरापासून ५०० ते ७०० फुट अंतरावर आहे. वादातील घटना एक वर्षापूर्वी घडली. मला घटनेबाबत प्रत्यक्ष काही माहिती नाही. घटनेच्या दिवशी आरोपी सुलतान माझ्याकडे आला नव्हता. अस झाल नाही की दि. ०९/१०/२०२४ रोजी संध्याकाळी ७ वाजता आरोपी माझ्याकडे आला आणि त्याने मटन कापण्यासाठी माझ्याकडून सत्तु घेवून गेला.

**अभियोग पक्षाचे म्हणणे असे आहे की साक्षीदार त्यांना पाठिंबा देत नसल्यामुळे साक्षीदाराला उलटतपास करण्याच्या अनुषंगाने प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात यावी. अभियोग पक्षाचे म्हणणे लक्षात घेता मागितलेली परवानगी देण्यात येत आहे.**

**२.** दि. २६/१२/२०२४ रोजी पोलिसांनी माझ्याकडे विचारपूस केली होती. हे म्हणणे खरे नाही की मी पोलिसांना माझ्या जबाबामध्ये अस सांगितल होत की दि. ०९/१०/२०२४ रोजी

सायंकाळी ७ वाजता आरोपी सुलतान हा माझ्या दुकानामध्ये आला आणि माझ्याकडून सत्तु घेवून गेला. हे म्हणणे खरे नाही की पोलिसांनी मला सदर गुन्ह्यामध्ये जप्त असलेला सत्तु दाखवला होता आणि तो सत्तु ओळखून मी पोलिसांना सांगितल होत की तो सत्तु मी माझ्या दुकानामध्ये वापरत होतो. मला आता माझ्या पोलिस जबाबामधील अधोरेखांकित भाग 'ए' आणि 'बी' मधील मजकूर वाचून दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा नाही. मी याला कारण सांगू शकत नाही की तो मजकूर माझ्या जबाबामध्ये पोलिसांनी का लिहिला आहे.

**३.** हे म्हणणे खरे नाही की सुलतान माझा नातेवाईक असल्याने तो नेहमी माझ्या दुकानात येत जात होता. हे म्हणणे खरे नाही की घटनेच्या दिवशी आरोपी सुलतान हा माझ्या दुकानातून सत्तु घेवून गेला होता. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला शिक्षा होवू नये म्हणून मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलट तपास आरोपीतर्फे. ॲड. श्री. काळे यांच्या मार्फत</u>**

४. उलटतपास नाकारला.

श्रवणोत्तर स्वीकृत

**Sd/-**

**दिनांक : २८.०७.२०२६**

**( आर. बी. भागवत )**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश—२**
**लातूर**